मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# अतिधोकादायक इमारती रिकाम्या करा; पिंपरी महापालिका आयुक्तांचा आदेश

## पिंपरी-चिंचवड शहरात अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर संभाव्य धोका टाळण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी आदेश दिले आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड शहरातील अतिधोकादायक इमारतींमुळे जीवितहानी होऊ नये, यासाठी संबंधित मिळकतधारकांना तत्काळ नोटीस बजाविण्यात यावी, या इमारती रिकाम्या करण्याच्या सूचना द्याव्यात, तसेच आवश्यक कार्यवाही तातडीने करण्याचा आदेश महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिला. अतिक्रमणांवरील कारवाईला वेग देण्याची सूचनाही त्यांनी केली.




शहरातील अतिक्रमण, अनधिकृत बांधकामे, फेरीवाला व्यवस्थापन, बांधकाम परवानगी, पाणीपुरवठा, तसेच विविध विकास प्रकल्पांच्या अंमलबजावणीचा आयुक्तांनी आढावा घेतला. अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, तृप्ती सांडभोर, सह शहर अभियंता मनोज सेठिया, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सुनील भागवानी या वेळी उपस्थित होते. शहरातील पदपथांवरील अतिक्रमण तातडीने हटवून पादचाऱ्यांसाठी सुरक्षित मार्ग उपलब्ध करून द्यावा. फेरीवाला व्यवस्थापनाबाबत नियमानुसार कारवाई करावी. अनधिकृत बांधकामांवर प्रभावी कारवाई, बांधकाम परवानग्यांची नियमित पडताळणी, पाणीपुरवठा व्यवस्थेचे प्रभावी नियोजन, तसेच विविध विकास प्रकल्पांची कामे निर्धारित वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचनाही आयुक्तांनी केल्या.

कोणत्याही परिस्थितीमध्ये नाल्यांचा मूळ प्रवाह बाधित होणार नाही. त्यामुळे कोणतीही अनुचित घटना घडणार नाही, याची दक्षता घ्यावी. पाणी साचण्याच्या घटना घडण्याची शक्यता असते. त्याबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारींची तत्काळ दखल घेऊन त्याच वेळी कार्यवाही करावी. बांधकाम परवानगी, अग्निशामक परवानगी अशा विविध परवानग्या देण्याबाबत देखील प्रशासकीय यंत्रणांनी नियमानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केल्या.

नागरिकांना कचरा वर्गीकरण मोहिमेमध्ये सहभागी करून घेणे आवश्यक आहे. ओला व सुका कचरा वर्गीकरणासाठी नागरिकांमध्ये जनजागृती केली जाईल. ओला व सुका कचरा वेगळा करण्यासंदर्भात न्यायालयाचे आदेश नागरिकांपर्यंत पोहोचविले जाणार आहेत, असे महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले.

### परवानग्या देण्याबाबत नियमानुसार कार्यवाही

» कोणत्याही परिस्थितीमध्ये नाल्यांचा मूळ प्रवाह बाधित होणार नाही. त्यामुळे कोणतीही अनुचित घटना घडणार नाही, याची दक्षता घ्यावी. पाणी साचण्याच्या घटना घडण्याची शक्यता असते. त्याबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारींची तत्काळ दखल घेऊन त्याच वेळी कार्यवाही करावी. बांधकाम परवानगी, अग्निशामक परवानगी अशा विविध परवानग्या देण्याबाबतदेखील प्रशासकीय यंत्रणांनी नियमानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केल्या.

# मोशी कचरा डेपो दुर्घटनाग्रस्तांच्या दु:खावर नगरसेवक निखिल बोऱ्हाडेंकडून माणुसकीची फुंकर

## सामाजिक बांधिलकी जपत वाढदिवस साजरा न करता केला मदतीचा हात पुढे

**पिंपरी | प्रतिनिधी**

मोशी कचरा डेपो येथे झालेल्या दुर्दैवी दुर्घटनेने संपूर्ण परिसर हादरला असून, यात अनेक कुटुंबांनी आपले कर्ते पुरुष, सगेसोयरे गमावले आहेत. या भीषण अपघातामुळे अनेक घरे उद्ध्वस्त झाली असून, मृत व्यक्तींच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. अशा कठीण समयी, राजकारण आणि औपचारिकता बाजूला सारून माणुसकीचे दर्शन घडवत, नगरसेवक निखिल बोऱ्हाडे यांनी एक वेगळा आदर्श समाजासमोर ठेवला आहे.

या वर्षी स्वतःचा वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय घेत, . बोऱ्हाडे यांनी आपला वेळ मोशीकरांच्या समस्या सोडवण्यासाठी आणि विशेषतः या अपघातातील पीडित कुटुंबांना आधार देण्यासाठी खर्च केला. मोशी परिसरातील नागरिक वर्षानुवर्षे कचरा डेपोच्या समस्येने त्रस्त आहेत. या ठिकाणी नवीन कचरा येऊ नये आणि इथल्या नागरिकांना दुर्गंधीमुक्त आणि आरोग्यदायी वातावरण मिळावे, यासाठी निखिल बोऱ्हाडे यांनी महापालिका सभागृहात नेहमीच आक्रमक भूमिका घेतली आहे आणि नागरिकांच्या हक्कासाठी लढा उभारला आहे. त्यांच्या या



तत्परतेची प्रचिती या दुर्घटनेनंतर पुन्हा एकदा आली.

अपघाताचे गांभीर्य ओळखून, श्री. बोऱ्हाडे यांनी केवळ सांत्वनपर संदेश देऊन थांबण्याचे टाळले. त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन, प्रत्येक मृत व्यक्तीच्या घरी जाऊन त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. या भेटीदरम्यान, त्यांनी दुःखात बुडलेल्या कुटुंबांना केवळ आर्थिक मदतच केली नाही, तर त्यांना या कठीण प्रसंगातून बाहेर पडण्यासाठी आवश्यक असलेला मानसिक आधारही दिला. प्रत्येकाच्या घरी जाऊन त्यांच्या वेदना जाणून घेणे, त्यांच्या अश्रू पुसणे आणि 'मी तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे' असा विश्वास देणे, ही त्यांची कृती खऱ्या अर्थाने संवेदनशील लोकप्रतिनिधीची ओळख करून देणारी ठरली आहे.

त्यांच्या या उपक्रमाने समाजामध्ये एक वेगळा आदर्श निर्माण केला असून, संकटाच्या काळात एकमेकांच्या पाठीशी उभे राहण्याची भावना अधिक बळकट केली आहे. अशा संवेदनशील आणि कृतीशील नेतृत्वाची आज समाजाला खऱ्या अर्थाने गरज आहे, अशा भावना मोशी परिसरातील नागरिकांनी व्यक्त केल्या आहेत.

# पिंपरी-चिंचवड शहराच्या लोकभिमुख विकासावर भर

## प्रारुप विकास आराखड्याच्या हरकतींवर सुनावणी सुरु

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी:पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या बहुप्रतिक्षित सुधारित प्रारूप विकास योजना (डीपी) आराखड्यावरील प्राप्त हरकती आणि सूचनांवर प्रत्यक्ष सुनावणी प्रक्रियेला आकुर्डी येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात अधिकृतपणे सुरुवात झाली आहे. शहराच्या भवितव्याची आणि पुढील काही दशकांच्या नगररचनेची दिशा ठरवणाऱ्या या विकास आराखड्यावर नागरिकांकडून तब्बल ५६ हजार ७७९ हरकती व सूचना नोंदवण्यात आल्या आहेत. या सर्व हरकतींचे निरसन करण्यासाठी आणि नागरिकांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी महापालिकेची नियोजन समिती पुढील सुमारे चार महिने ही विशेष सुनावणी प्रक्रिया राबवणार असून, पहिल्या टप्प्यामध्ये पिंपरी परिसरातील हरकतींवर विचार केला जात आहे.





महापालिकेच्या वतीने १५ मे २०२५ रोजी सुमारे १७३.२८ चौरस किलोमीटर क्षेत्राचा समावेश असलेला सुधारित विकास आराखडा प्रसिद्ध करण्यात आला होता. या आराखड्यात सन २०३१ पर्यंत ४२ लाख, तर २०४१ पर्यंत सुमारे ६१ लाख लोकसंख्या गृहीत धरून नियोजन करण्यात आले आहे. यावर १४ जुलै २०२५ पर्यंत नागरिकांना हरकती नोंदवण्याची मुदत देण्यात आली होती. प्राप्त झालेल्या ५६ हजार ७७९ हरकतींवर पारदर्शकपणे सुनावणी घेण्यासाठी महापालिकेच्या सर्वसाधारण सभेने १५ मे २०२६ रोजी विशेष प्राधिकृत नियोजन समितीची स्थापना केली असून, या समितीमार्फत प्रत्यक्ष कामकाजाचा श्रीगणेशा करण्यात आला आहे.

सुनावणी प्रक्रियेदरम्यान नागरिकांना आपले म्हणणे मांडणे सुलभ जावे यासाठी नाट्यगृहाच्या मुख्य रंगमंचावर भव्य स्क्रीन उभारण्यात आली आहे. या स्क्रीनवर जुना डीपी, नवीन प्रस्तावित डीपी, प्रत्यक्ष नकाशा आणि गूगल सॅटेलाईट इमेजेस एकाच वेळी दाखवून संबंधित जागेची सविस्तर पाहणी केली जात आहे. पहिल्या टप्प्यात पिंपरी भागातील १२ हजार ३०० हरकतींवर ३ ते १४ ऑगस्ट या कालावधीत सुनावणी घेतली जाणार असून, टपालाने नोटीस पाठवलेल्या नागरिकांनाच प्रवेश दिला जात आहे. पहिल्या दिवशी ५५ हरकतदारांना पाचारण करून त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

या सुनावणीच्या वेळी समितीचे सदस्य, माजी नगरसेवक, नगररचना विभागाचे अधिकारी, निवृत्त सहसंचालक प्रकाश भुक्ते, निवृत्त उपसंचालक उत्तरेश्वर लोंढे, वास्तुविशारद नरसू शिंदे, नगररचना उपसंचालक ललित खोब्रागडे व अनुपमा कुलकर्णी यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते. संपूर्ण सुनावणी प्रक्रिया शिस्तबद्ध आणि सुरळीत पार पाडण्यासाठी १ जुलै ते ३१ डिसेंबर या कालावधीत ग. दि. माडगूळकर नाट्यगृह आरक्षित ठेवण्यात आले आहे.

> **" आदरणीय आमदार महेश दादा लांडगे यांच्या आम्हाला नेहमी सूचना असतात की नागरिकांचे नुकसान तसेच श्रद्धा भावना न दुखवता आणि पिंपरी चिंचवडचा विकास कसा होईल याचा विचार करा. याच मार्गदर्शक तत्त्वांनुसार समिती सर्व नागरिकांच्या सूचनांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून, कोणावरही अन्याय होणार नाही आणि शहराचा विकासही बाधित होणार नाही, अशा संतुलित पद्धतीने निर्णय घेण्याचा प्रयत्न असेल."**
>
> **- सारिका रवींद्र गायकवाड,**
> **प्राधिकृत नियोजन समिती सदस्या**

# पिंपरी-चिंचवडमध्ये मतदार पडताळणीला वेग; चार दिवसांत 23 टक्के मतदारांची नोंदणी पूर्ण करण्याचे आव्हान

## एसआयआर मोहिमेत आतापर्यंत 67 टक्के काम पूर्ण; पिंपरी, चिंचवड, भोसरीतील उर्वरित मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी बीएलओंची धावपळ

**पिंपरी | प्रतिनिधी**

विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) या मतदार पडताळणी मोहिमेत शहरातील मतदारांची नोंदणीची प्रक्रिया आत्तापर्यंत 67 टक्के इतकी झाली आहे. पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदारसंघांतील तब्बल 23 टक्के मतदारांची नोंदणी अद्याप शिल्लक आहे. उर्वरित चार दिवसांत 100 टक्के मतदारांची पडताळणी करण्याचे आव्हान शिक्षक व बीएलओ यांच्यावर आहे.



मतदार पडताळणी मोहिमेत बीएलओंकडून मतदारांकडून गणना अर्ज भरून घेतला जात आहे. अर्ज वेळेत भरून सादर करणाऱ्या मतदारांची नावे प्रारूप मतदार यादीत समाविष्ट करण्यात येत आहे. मात्र, बीएलओकडून घरोघरी जाऊन अर्ज भरून घेतले जात नाहीत. नगरसेवक, राजकीय पदाधिकाऱ्यांच्या संपर्क कार्यालय तसेच, कॉलनी व वस्तीतील सभागृहात अर्ज भरून घेतले जात आहेत.

आत्तापर्यंत शहरातील पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदार संघातील एकूण 67 टक्के मतदारांची पडताळणी पूर्ण करण्यात आली आहे. पिंपरी मतदार संघात एकूण 4 लाख 1 हजार 975 मतदार आहेत. चिंचवड मतदार संघात सर्वाधिक 6 लाख 87 हजार 448 आणि भोसरी मतदार संघात 6 लाख 35 हजार 114 मतदार आहेत. शहरात एकूण 17 लाख 24 हजार 537 मतदार आहेत.

उर्वरित 23 टक्के मतदारांची पडताळणी बाकी आहे. ही मोहिमेचा शनिवारी (दि.8) शेवटचा दिवस आहे. उर्वरित 4 दिवसात शिल्लक असलेल्या सर्व मतदारांपर्यंत पोहण्याचे आव्हान शिक्षक तसेच, बीएलओ यांच्यासमोर आहे. त्या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

# शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मोबदला देण्यास विलंब, अधिकाऱ्यांच्या चौकशीचे महापालिका आयुक्तांचे आदेश

## महापालिकेचे आश्वासन : दोन-तीन दिवसांत रक्कम अदा; विलंबास जबाबदार अधिकाऱ्यांच्या चौकशीचे आदेश

**पुणे | प्रतिनिधी**

देवाची उरूळी आणि फुरसुंगी येथील कचरा डेपोसाठी शेतकर्‍यांची जागा घेतल्यानंतर मोबदला देण्यास विलंब लावणारे आणि न्यायालयीन खटल्याकडे दुर्लक्ष करणार्‍या अधिकार्‍यांची चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. शेतकर्‍यांना येत्या दोन तीन दिवसांत त्यांचे पैसे देण्यात येतील. यानंतर या भूसंपादन मोबदला प्रकरणी न्यायालयात अपिल दाखल करण्यात येईल, अशी माहिती महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली.




### न्यायालयीन प्रक्रियेनंतर प्रशासन सक्रिय

» स्मॉल कॉज कोर्टाच्या आदेशानंतर महापालिका प्रशासनाने तातडीने न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल करून शेतकऱ्यांना मोबदला देण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. न्यायालयाच्या निर्देशानुसार ११ ऑगस्टपूर्वी सर्व देयके अदा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यानंतर या भूसंपादन मोबदला प्रकरणी पुढील कायदेशीर प्रक्रिया आणि अपील दाखल करण्याची तयारीही महापालिकेकडून सुरू करण्यात आली आहे. प्रशासनाच्या या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून रखडलेला प्रश्न मार्गी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

### शेतकऱ्यांना मोबदल्याचा दिलासा

» देवाची उरूळी आणि फुरसुंगी येथील कचरा डेपोसाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला न मिळालेल्या शेतकऱ्यांना येत्या दोन ते तीन दिवसांत रक्कम देण्यात येणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली. न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करून ११ ऑगस्टपर्यंत मोबदला अदा करण्याचे आश्वासन महापालिकेने दिले आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या प्रकरणात सकारात्मक हालचाल सुरू झाली असून, शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काची रक्कम मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

### अधिकाऱ्यांच्या भूमिकेची चौकशी

» भूसंपादन मोबदला प्रकरणात न्यायालयीन आदेश असूनही आवश्यक कार्यवाही न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेची चौकशी करण्याचे आदेश महापालिका आयुक्तांनी दिले आहेत. अतिरिक्त आयुक्तांकडे चौकशीची जबाबदारी सोपवण्यात आली असून, विलंबाला जबाबदार असणाऱ्यांची जबाबदारी निश्चित केली जाणार आहे. भविष्यात अशा प्रकारची निष्काळजीपणा होऊ नये आणि न्यायालयीन आदेशांची वेळेत अंमलबजावणी व्हावी, यासाठी प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे.

महापालिकेने देवाची उरूळी आणि फुरसुंगी येथे २००२ मध्ये कचरा डेपोसाठी सुमारे १०० एकर जागा संपादीत केली होती. परंतू भूसंपादनानंतरही काही शेतकर्‍यांचा मोबदला देण्यात आला नव्हता. याविरोधात शेतकर्‍यांनी न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयानेही शेतकर्‍यांना वाढीव दराने मोबदला देण्याचे आदेश दिले होते. साधारण २०१८ मध्ये देण्यात आलेल्या आदेशानंतरही महापालिका प्रशासनाकडूनकुठलिही हालचाल झाली नव्हती. याविरोधात शेतकर्‍यांनी पुन्हा लघुवाद न्यायालयात दाद मागितली होती.

या न्यायालयाने महिन्याभरापुर्वी मोबदला देण्यास टाळाटाळ करणार्‍या महापालिका प्रशासनाच्या विरोधात आदेश देताना आयुक्तांची खुर्ची व इतर साहित्य जप्त करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार न्यायालयातील बेलिफ सोमवारी शेतकर्‍यांच्या उपस्थितीत पोलिस बंदोबस्तात आले होते. यावरून बराचकाळ राडा सुरु होता. दरम्यान, महापालिकेच्या विधी विभागाने तातडीने न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करत ११ ऑगस्ट पर्यंत शेतकर्‍यांना मोबदला देण्याचे आश्‍वासित केले. यामुळे पुढील कार्यवाही टळली.

यासंदर्भात महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्याकडे विचारणा केली असता ते म्हणाले, एक महिन्यापुर्वी न्यायालयाने दिलेले आदेश महापालिकेला मिळाले नव्हते. परंतू काल याची प्रत मिळाल्यानंतरर तातडीने प्रतिज्ञापत्र देण्यात आले. येत्या दोन तीन दिवसांत ही रक्कम देण्यात येईल. या प्रकरणाकडे दुर्लक्ष करणार्‍या अधिकार्‍यांची चौकशी करण्याचे आदेश अतिरिक्त आयुक्तांना देण्यात आले आहेत.

# ज्ञानेश्वर-तुकाराम महाराजांच्या पालख्या पुण्यात दाखल; विठ्ठल मंदिरांमध्ये स्वागताची जय्यत तयारी

## भवानी पेठ आणि नवी पेठ विठ्ठल मंदिरांत फुलांची सजावट, विद्युतरोषणाई अन् वारकऱ्यांच्या मुक्कामाची व्यवस्था पूर्ण

**पुणे | प्रतिनिधी**

आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरमध्ये श्री विठ्ठल-रुक्मिणी यांचे दर्शन घेऊन परतीच्या प्रवासाला निघालेल्या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या पालख्यांचे गुरुवारी (दि. ६) पुण्यात आगमन होणार आहे. त्यानिमित्त श्री विठ्ठल मंदिरांमध्ये तयारी पूर्ण झाली आहे.



टाळ-मृदंगांचा गजर आणि श्री विठ्ठलनामाचा जयघोष सगळीकडे दुमदुमणार आहे. या पार्श्वभूमीवर भवानी पेठेतील पालखी विठ्ठल मंदिर आणि नवी पेठेतील श्री विठ्ठल मंदिर परिसरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत असून, मंदिरांमध्ये फुलांची सजावट, आकर्षक विद्युतरोषणाई, मंडप उभारणी, वारकऱ्यांच्या मुक्कामाची व्यवस्था तसेच धार्मिक कार्यक्रमांची तयारी पूर्ण झाली आहे.

परतीच्या वाटेवर असलेल्या संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखीचा मुक्काम भवानी पेठेतील पालखी विठ्ठल मंदिरात, तर संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचा मुक्काम नवी पेठेतील श्री विठ्ठल मंदिरात असतो. यंदाही परतीच्या वाटेवर असलेल्या दोन्ही पालख्यांच्या स्वागतासाठी मंदिर प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे. गुरुवारी (दि. ६) आणि शुक्रवारी (दि. ७) दोन्ही पालख्या पुण्यात मुक्कामी असल्याने भाविकांना दर्शनाचा लाभ घेता येणार आहे.

भवानी पेठेतील पालखी विठ्ठल मंदिराचे विश्वस्त गोरखनाथ भिकुले म्हणाले की, संत ज्ञानेश्वर महाराज यांचा पालखी सोहळा गुरुवारी (दि. ६) सकाळी सहा वाजता मंदिरात येणार आहे. गुरुवारी (दि. ६) आणि शुक्रवारी (दि. ७) असे दोन दिवस पालखीचा मुक्काम मंदिरात असेल. शनिवारी (दि. ८) सकाळी १० वाजता पालखी सोहळा आळंदीकडे मार्गस्थ होणार आहे. श्री विठ्ठल मंदिरात संत तुकाराम महाराज पालखीचे गुरुवारी सायंकाळी पाच वाजता आगमन होणार आहे.

आगमनानंतर सायंकाळी ५.३० वाजता समाजारती, त्यानंतर महाप्रसाद, रात्री ८ वाजता कीर्तन, रात्री ९.३० वाजता शेजारती आणि रात्री ११ ते पहाटे ६ वाजेपर्यंत जागर होणार आहे. शुक्रवारी दिवसभर भाविकांना पालखीचे दर्शन घेता येणार आहे. शनिवारी सकाळी सहा वाजता पालखी सोहळा देहूकडे मार्गस्थ होईल, अशी माहिती मराठा मंडळ ट्रस्टच्या नवी पेठ श्री विठ्ठल मंदिराचे अध्यक्ष अविनाश गवारे आणि सचिव समीर पवार यांनी दिली.

# ‘आरटीई’ प्रवेशांचा यंदा उच्चांक; पहिल्यांदाच प्रवेशित विद्यार्थिसंख्या लाखानजीक

## यंदा तब्बल 96 हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी राज्यातील खासगी शाळांमधील 25 टक्के राखीव जागांवर प्रवेश निश्चित केला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) राज्यातील खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांसाठीच्या प्रवेश प्रक्रियेत यंदा उच्चांकी प्रवेश झाले आहेत. एकूण पाच फेऱ्यांतून ९६ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा आरटीईअंतर्गत प्रवेशित विद्यार्थी आठ हजारांनी वाढल्याचे स्पष्ट झाले असून, सुमारे १७ हजार जागा रिक्त राहिल्या आहेत.

आरटीईअंतर्गत आर्थिक दुर्बल, वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश देण्यात येतात. शिक्षण विभागाने आरटीईअंतर्गत प्रवेशांसाठी यंदा नियमांत बदल केला होता. त्यानुसार विद्यार्थ्याच्या घरापासून एक किलोमीटरच्या परिसरातील शाळेत प्रवेश बंधनकारक करण्यात आला होता. त्यानुसार नोंदणी प्रक्रियाही करण्यात आली. मात्र, या निर्णयाला न्यायालयात आव्हान देण्यात आले. न्यायालयाने शिक्षण विभागाचा नियम रद्द करण्याचा आदेश दिला. त्यामुळे विद्यार्थ्याच्या घरापासून तीन किलोमीटर परिसरातील शाळा प्रवेशाची संधी पुन्हा उपलब्ध झाली. परिणामी, पुन्हा अर्ज नोंदणी करून प्रवेश प्रक्रिया राबवण्यास विलंब झाला.

यंदाच्या प्रवेश प्रक्रियेत राज्यातील ८ हजार ७०१ शाळांतील १ लाख १४ हजार ८२६ जागा प्रवेशासाठी उपलब्ध होत्या. त्यासाठी एकूण २ लाख ८९ हजार २८६ अर्ज दाखल झाले. प्रवेशासाठी काढण्यात आलेल्या ऑनलाइन सोडतीमध्ये १ लाख ५ हजार ८११ विद्यार्थ्यांची निवड झाली. त्यापैकी ७९ हजार ८६३ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला. त्यानंतर उर्वरित जागांवर प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी देण्यासाठी चार फेऱ्या राबवण्यात आल्या. ३१ जुलै रोजी प्रवेश प्रक्रिया संपुष्टात आली. त्यातून नियमित विद्यार्थी, प्रतीक्षा यादीतील विद्यार्थी मिळून एकूण ९६ हजार ९९० विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केल्याचे आरटीई प्रवेशाच्या संकेतस्थळावर नमूद करण्यात आले आहे.



### सर्वाधिक प्रवेश पुणे जिल्ह्यात, सर्वांत कमी सिंधुदुर्गात

» प्रवेश प्रक्रियेत सर्वाधिक १६७५८ प्रवेश पुणे जिल्ह्यात झाले आहेत. त्याशिवाय ठाणे जिल्ह्यात ९३१५, नागपूर जिल्ह्यात ६२७४, नाशिक जिल्ह्यात ४९२९, छत्रपती संभाजीनगरमध्ये ४४४४, अहिल्यानगर जिल्ह्यात ३४०५ विद्यार्थ्यांचे प्रवेश झाले. तर सर्वांत कमी १३१ प्रवेश सिंधुदुर्ग जिल्ह्यात झाले. नंदुरबार जिल्ह्यात ३२८, गडचिरोली जिल्ह्यात ४८२, रत्नागिरी जिल्ह्यात ६०३, हिंगोली जिल्ह्यात ८०३, भंडारा जिल्ह्यात ८६२, वाशिम जिल्ह्यात ९०१ विद्यार्थ्यांचे प्रवेश झाल्याचे संकेतस्थळावर नमूद करण्यात आले आहे.

### आरटीई प्रवेशांचा नवा विक्रम

» यंदा शिक्षण हक्क कायदा (आरटीई) अंतर्गत खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांसाठी तब्बल ९६,९९० विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले. ही आतापर्यंतची सर्वाधिक प्रवेशसंख्या ठरली आहे. राज्यातील ८,७०१ शाळांमधील १,१४,८२६ जागांसाठी २.८९ लाखांहून अधिक अर्ज प्राप्त झाले. नियमित सोडत आणि त्यानंतरच्या चार प्रतीक्षा फेऱ्यांमधून विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आले. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा सुमारे ८ हजार अधिक विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाल्याने आरटीई प्रवेश प्रक्रियेत नवा विक्रम नोंदवला गेला.

### रिक्त जागांमध्ये घट

» गेल्या वर्षी आरटीईअंतर्गत सुमारे २१ हजार जागा रिक्त राहिल्या होत्या. यंदा त्या कमी होऊन सुमारे १७ हजारांवर आल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या वाढत्या प्रतिसादामुळे प्रवेश प्रक्रिया अधिक प्रभावी ठरल्याचे शिक्षण विभागाने स्पष्ट केले. एकूण पाच फेऱ्यांमधून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि वंचित घटकांतील अधिकाधिक विद्यार्थ्यांना दर्जेदार खासगी शाळांमध्ये शिक्षणाची संधी उपलब्ध झाली आहे.

# सुनेत्रा पवार वक्तव्याविरोधात राष्ट्रवादीचे पुण्यात आंदोलन; काँग्रेस नेत्यांच्या माफीची मागणी

## बालगंधर्व चौक आणि काँग्रेस भवनासमोर घोषणाबाजी; महिला नेतृत्वाचा सन्मान राखण्याचे आंदोलकांचे आवाहन

**पुणे | प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याबाबत काँग्रेसच्या नेत्यांकडून करण्यात आलेल्या आक्षेपार्ह व अपमानास्पद वक्तव्याच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने मंगळवारी पुण्यात जोरदार आंदोलन केले. बालगंधर्व चौकातील झाशीची राणी यांच्या पुतळ्यासमोर तसेच काँग्रेस भवनासमोर घोषणाबाजी करीत कार्यकर्त्यांनी तीव्र निषेध नोंदविला. महिला नेतृत्वाचा सन्मान राखण्याची मागणी करीत संबंधित नेत्यांनी जाहीर माफी मागावी, अशी मागणीही आंदोलकांनी केली.

बालगंधर्व चौक, जंगली महाराज रस्ता येथे प्रदीप देशमुख, सुभाष जगताप आणि राजलक्ष्मी भोसले यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. या वेळी महिला नेतृत्वाचा अवमान करणारी भाषा अस्वीकार्य असल्याचे सांगत काँग्रेसविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यापासून आजपर्यंत महिलांनी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय नेतृत्व केले असून, त्यांच्या योगदानाचा सन्मान होणे अपेक्षित असताना त्यांच्याविषयी अपमानास्पद वक्तव्ये केली जात असल्याचा आरोप आंदोलकांनी केला.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसच्या दुसऱ्या गटाने सुनील टिंगरे आणि वैशाली नागवडे यांच्या नेतृत्वाखाली थेट काँग्रेस भवनावर मोर्चा काढला. काँग्रेस प्रदेशाध्यक्षांविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. या वेळी आंदोलक पुढे सरसावल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाऊ नये म्हणून पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करीत आंदोलकांना रोखले. त्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडला नाही.

आंदोलनादरम्यान महिला नेतृत्वाचा सन्मान राखणे ही प्रत्येक राजकीय पक्षाची नैतिक जबाबदारी असल्याचे आंदोलकांनी स्पष्ट केले. महिलांविषयी अवमानकारक वक्तव्यांमुळे समाजात चुकीचा संदेश जात असल्याचे सांगत संबंधित नेत्यांनी बिनशर्त माफी मागावी आणि भविष्यात अशा प्रकारची भाषा टाळावी, अशी मागणी करण्यात आली.



### राजकीय वातावरण तापले

» उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याबाबत करण्यात आलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेसने पुण्यात तीव्र आंदोलन केले. बालगंधर्व चौक आणि काँग्रेस भवनासमोर कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत संबंधित नेत्यांनी बिनशर्त जाहीर माफी मागावी, अशी मागणी केली. महिला नेतृत्वाचा अवमान सहन केला जाणार नाही, असा इशारा आंदोलकांनी दिला. काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाल्यानंतर पोलिसांनी हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली. या घटनेमुळे काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील राजकीय संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, महिला सन्मानाचा मुद्दा पुन्हा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे.